आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता

८ एप्रिल २०२४ - सोमवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- लोकसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यातल्या मतदानासाठी उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा आज शेवटचा दिवस
- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची आज चंद्रपुरात प्रचार सभा
- तिन्ही संरक्षण दलांमध्ये समन्वय वाढवण्यासाठी पहिली संयुक्त परिषद आज नवी दिल्लीत

**आणि**

- आयपीएलमध्ये आज चेन्नई सुपर किंग्जचा सामना कोलकाता नाइट रायडर्सशी

**<><><><><><>**

लोकसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यातल्या मतदानापूर्वी उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा आज शेवटचा दिवस आहे. या टप्प्यात १२ राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांमधल्या ८८ लोकसभा मतदारसंघांमधे निवडणूक होणार आहे. राज्यातल्या बुलडाणा, अकोला, अमरावती, वर्धा, यवतमाळ-वाशिम, हिंगोली, नांदेड आणि परभणी या ८ लोकसभा मतदारसंघात दुसऱ्या टप्प्यात २६ एप्रिल रोजी मतदान होणार आहे. छाननीनंतर राज्यातल्या आठ मतदारसंघात २९९ उमेदवारांचे अर्ज वैध ठरले आहेत. त्यात नांदेडमधे सर्वाधिक ६६ अर्ज वैध ठरले आहेत. अमरावतीमध्ये ५६, हिंगोलीत ४८, परभणीत ४१, वर्ध्यात २६, बुलडाण्यात २५, यवतमाळ-वाशिममध्ये २०, आणि अकोल्यात १७ अर्ज वैध आहेत.

परभणीतून अपक्ष बाळासाहेब उगले यांनी अर्ज मागे घेतला आहे.

**<><><><><><>**

देशाच्या विविध भागात लोकसभा निवडणुकीच्या प्रचारसभा होत आहेत. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची राज्यातली पहिली प्रचारसभा आज चंद्रपुरात महायुतीचे चंद्रपूरचे उमेदवार सुधीर मुनगंटीवार तसंच गडचिरोली चिमूर मतदार संघाचे उमेदवार अशोक नेते यांच्यासाठी होत आहे. या सभेच्या दृष्टीनं चोख सुरक्षा व्यवस्था ठेवण्यात आली आहे. विदर्भातल्या पाच मतदार संघात १९ एप्रिलला मतदान होणार आहे.

<><><><><><>

लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीतल्या घटक पक्षांमध्ये ताळमेळ नसून, कुरघोडी सुरू असल्याचा आरोप वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी केला आहे. अकोल्यात काल पत्रकार परिषदेत ते बोलत होते. याविषयी काँग्रेसच्या नेत्यांना सांगितलं होतं, असा दावाही त्यांनी केला. राज्यातल्या उर्वरित जागांवर २ दिवसात निर्णय जाहीर करणार असल्याचं आंबेडकर यांनी यावेळी सांगितलं.

<><><><><><>

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे वायव्य मुंबई लोकसभा मतदार संघातले उमेदवारी अमोल किर्तीकर यांची आज ईडी अर्थात सक्तवसुली संचलनालयाकडून चौकशी सुरू आहे. कोरोना काळातल्या कथित खिचडी घोटाळ्याप्रकरणी  ईडीच्या मुंबई कार्यालयात ही चौकशी होत आहे.

बांधकाम व्यावसायिक युसूफ मोहम्मद लकड़ावाला आणि अन्य प्रकरणात आज सक्तवसुली संचालनालयाच्या मुंबईतल्या अधिकाऱ्यांनी   लोणावळानजीक मावळ इथं एक कोटी ८१ लाख रुपयांच्या मालमत्तेवर टाच आणली आहे. पीएमएलए अर्थात आर्थिक  गैरव्यवहार प्रतिबंधक कायदा २००२ च्या

तरतुदींनुसार ही कारवाई करण्यात आली आहे.  या कारवाईत  पुणे स्थित वीआयपीएस ग्रुप ऑफ कंपनीज आणि ग्लोबल एफिलिएट बिजनेस कंपनीचे मालक विनोद खुटे यांच्या परिवारातल्या विविध सदस्यांच्या मालकीच्या संपत्तीचाही समावेश आहे. त्यांचे पुण्यातले  पाच  फ्लॅट, दोन बहुउद्देशीय सभागृहं, दोन कार्यालयं तसंच अहमदनगर जिल्ह्यातल्या २ हेक्टर भूखंडालाही सील करण्यात आलं आहे.

**<><><><><><>**

छत्तीसगडमधल्या सुकमा जिल्ह्यात नक्षलवाद्यांनी लपवून ठेवलेल्या स्फोटकांचा मोठा साठा सुरक्षा दलांनी काल जप्त केला. सीआरपीएफ, कोब्रा बटालियन आणि बस्तर बटालियन यांच्या संयुक्त पथकानं किस्टाराम पोलिस ठाण्याच्या हद्दीत तोंडामार्का आणि डब्बामरका गावांदरम्यान ही कारवाई केली. जप्त केलेल्या साहित्यात ३५० जिलेटिनच्या कांड्या,१०५ इलेक्ट्रिक डिटोनेटर, एक बॅरल ग्रेनेड लाँचर इत्यादी साहित्यांचा समावेश आहे.

**<><><><><><>**

श्रोतेहो, राज्यातल्या लोकसभा मतदारसंघातले उमेदवार, निवडणूक लढवण्यामागची त्यांची भूमिका, स्थानिक राजकारण यांचा आढावा घेणारा ‘लोकनिर्णय महाराष्ट्राचा’ हा कार्यक्रम, आकाशवाणीनं सुरू केला आहे. कार्यक्रमाच्या आजच्या भागात आपण परभणी लोकसभा मतदार संघाचा आढावा घेणार आहोत. संध्याकाळी सव्वा सात ते साडे सात वाजेपर्यंत आकाशवाणी मुंबईच्या अस्मिता वाहिनीवर आणि समाज माध्यमांवर हा कार्यक्रम ऐकता येईल.

**<><><><><><>**

दिल्लीतल्या विशेष सीबीआय न्यायालयानं भारत राष्ट्र समितीच्या नेत्या के कविता यांना जामीन द्यायला नकार दिला. मुलाच्या परीक्षेसाठी कविता यांनी जामीनाची मागणी केली होती. जामीन मिळाला तर कविता पुरावे नष्ट करतील आणि साक्षीदारांना प्रभावित करतील असा दावा करत सक्तवसुली संचलनालयानं या जामीनाला विरोध केला. कविता ९ एप्रिलपर्यंत न्यायालयीन कोठडीत आहेत. १५ मार्च रोजी त्यांना अटक झाली होती.

<><><><><><>

दिल्ली विधानसभेत गैरवर्तन केल्याबद्दल आज भाजपाच्या सहा सदस्यांना सभागृहाबाहेर काढण्यात आलं. तत्पूर्वी आज सकाळी कामकाजाला सुरुवात झाली तेव्हा दिल्ली जल बोर्डाचा मुद्दा चर्चेला घेण्यात आला. विरोधी पक्षनेते रामवीर सिंग बिधुरी यांनी या बोर्डातल्या भ्रष्टाचाराचा मुद्दा उपस्थित करायचा प्रयत्न केला. त्यासाठी अध्यक्ष राम निवास गोयल यांनी परवानगी दिली नाही. त्यानंतर भाजपा सदस्य हौद्यात उतरले आणि आप सरकारच्या निषेधात घोषणा दिल्या.

अध्यक्षांनी वारंवार  शांतता राखण्याचं आवाहन करूनही गदारोळ सुरूच राहिला. त्यानंतर अध्यक्षांनी मार्शलना बोलावून त्यांना बाहेर काढलं. या सदस्यांनी नंतर विधानसभेबाहेरही घोषणाबाजी केली.

<><><><><><>

संयुक्तता आणि एकात्मतेच्या प्रयत्नांना चालना देण्यासाठी नवनवीन कल्पना, पुढाकार आणि सुधारणा निर्माण करण्याच्या उद्देशानं, संरक्षण विभागाच्या तीनही दलाची परिवर्तन चिंतन नामक परिषद आज नवी दिल्लीत होत आहे. संरक्षणदल प्रमुख जनरल अनिल चौहान यांच्या अध्यक्षतेखाली विविध विषयांवर यात

दिवसभर चर्चा होईल. तीनही संरक्षण दलाचे प्रमुख, लष्कराच्या विविध विभागातले अधिकारी यांची ही पहिली संयुक्त परिषद आहे.

<><><><><><>

NCERT, अर्थात राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषदेनं परिषदेच्या पाठ्यपुस्तकांच्या साहित्याची व्यावसायिक वापरासाठी प्रकाशित करणारी कोणतीही व्यक्ती किंवा संस्थे विरुद्ध स्वामित्त्व हक्क कायद्यांतर्गत कायदेशीर कारवाई करण्याचा इशारा दिला आहे. शैक्षणिक संस्थांनी अशी पाठ्यपुस्तकं किंवा कार्यपुस्तकं वापरू नये, त्यातला मजकूर चुकीचा असू शकतो. कोणत्याही व्यक्तीला अशी बनावट पाठ्यपुस्तकं किंवा कार्यपुस्तकं आढळली तर त्यांनी तात्काळ कळवण्याचं आवाहन परिषदेनं केलं आहे.

<><><><><><>

भारत आणि पेरू यांच्यादरम्यान व्यापार कराराबद्दल चर्चेची सातवी फेरी नवी दिल्लीत सुरू आहे. दोन्ही देशांमध्ये व्यापार आणि गुंतवणूक वाढवण्यासाठी द्विपक्षीय सहकार्य मजबूत करणं हा या बैठकीचा उद्देश आहे. भारत आणि पेरू यांच्यातले द्विपक्षीय संबंध मजबूत करण्यासाठी आणि आर्थिक विकासाला गती देण्याच्या भारताच्या वचनबद्धतेचा पुरावा असल्याचं वाणिज्य आणि उद्योग विभागानं म्हटलं आहे.

<><><><><><>

फ्रान्सची राजधानी पॅरिसमध्ये काल रात्री आठ मजली इमारतीत झालेल्या स्फोटात तीन जणांचा मृत्यू झाला. स्फोटाचे कारण अद्याप स्पष्ट झालेलं नाही. स्फोटाचे कारण शोधण्यासाठी तपास सुरू करण्यात आला आहे. स्फोटानंतर

आजूबाजूच्या इमारतींमधल्या रहिवाशांना बाहेर काढण्यात आलं. पॅरिसमध्ये गेल्या काही वर्षांतला हा तिसरा स्फोट आहे.

**<><><><><>**

रशिया नियंत्रित झापोरिझिया अणुऊर्जा प्रकल्पाच्या एका अणुभट्टीवर युक्रेननं केलेल्या ड्रोन हल्ल्याचा संयुक्त राष्ट्रांच्या अणुऊर्जा संस्थेचे प्रमुख राफेल मारियानो ग्रोसी यांनी निषेध केला आहे. अशा हल्ल्यांमुळे अणु अपघाताचा धोका **लक्षणीयरित्या** वाढू शकतो, असं त्यांनी म्हटलं आहे. या हल्ल्यात कोणतीही गंभीर हानी आणि जीवितहानी झाली नाही. अणुऊर्जा प्रकल्पाच्या मुख्य अणुभट्टीच्या सुरक्षा रचनेवर तीन थेट हल्ले झाल्याचं ग्रोसी यांनी समाज माध्यामावर केलेल्या पोस्टमध्ये म्हटलं आहे.

**<><><><><>**

उत्तर अमेरिका आणि आसपासच्या काही भागात आज संपूर्ण सुर्यग्रहण पहायला मिळणार आहे.  भारतीय प्रमाणवेळेनुसार संपूर्ण सूर्यग्रहण रात्री ९ वाजून १२ मिनिटांनी सुरू होईल आणि उद्या पहाटे २ वाजून २२ व्या मिनिटाला संपेल. भारतात मात्र हे ग्रहण दिसणार नाही.

**<><><><><>**

आयपीएलमध्ये आज चेन्नई सुपर किंग्जचा सामना कोलकाता नाइट रायडर्सशी होणार आहे. चेन्नईच्या एमए चिदंबरम स्टेडियमवर संध्याकाळी साडेसात वाजता ह्या सामन्याला सुरुवात होईल. काल झालेल्या सामन्यांमध्ये लखनौ सुपर जायंट्सनं गुजरात टायटन्सचा ३३ धावांनी तर मुंबई इंडियन्सनं दिल्ली कॅपिटल्सचा २९ धावांनी पराभव केला.

**<><><><><>**

वसईचे माजी आमदार आणि जनता दलाचे ज्येष्ठ नेते डॉमनिक गोन्सालविस यांच्या पार्थिवावर आज सकाळी अंत्यसंस्कार झाले. वृद्धापकाळानं काल त्यांचं राहत्या घरी निधन झालं होतं. ठाणे जिल्हा परिषद सदस्य, अशा विविध पदांवर त्यांनी आपल्या कामाचा ठसा उमटवला. तसंच सामाजिक क्षेत्रातही त्यांचं मोठं योगदान होतं.

**<><><><><><>**

भारतीय टेनिसपटू सुमित नागल हा मॉन्टे कार्लो मास्टर्स एकेरीच्या मुख्य ड्रॉमध्ये प्रवेश करणारा ४२ वर्षांतला पहिला भारतीय ठरला आहे. त्यानं काल अंतिम पात्रता फेरीत अर्जेंटिनाच्या फॅकुंडो डायझ अकोस्टाचा ७-५, २-६, ६-२ असा पराभव केला.

**//<><><><><><>//**